<u>स्पे.मु.क्र. ६१/२००९</u>

<u>संयुक्त आदेश निशाणी क्र.५२ व ६३ वर</u>

१. निशाणी ५२ व ६३ अर्ज वाचले. निशाणी ५२ वरील प्रतिवादीचे म्हणणे वाचले. निशाणी ६३ वर प्रतिवादीने म्हणणे सादर केले नाही. वादीचे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी व त्यांचे वकीलांना पुकारले असता उपस्थित नाहीत.

२. प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे प्रस्तावित सुधारणा करणेस परवानगी मिळणेसाठी सादर केला आहे. वादी क्र.२ दिनांक १८-७-२०१० रोजी मयत झाले आहेत. तिचे वादी क्र.१ हे एकमेव वारस आहेत. या अनुषंगाने सुधारणा करणेस परवानगीसाठी प्रस्तुत अर्ज केला आहे. निशाणी ५२ अर्ज दिनांक १५-०९-२०२१ रोजी दाखल केला आहे. याच कारणासाठी निशाणी ६३ अर्ज दिनांक २३-३-२०२२ रोजी दाखल केला आहे. दोन्ही अर्जाचा उद्‌देश व प्रस्तावित सुधारणा सारखीच आहे.

३. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे पक्षकारातील खराखुरा वादप्रश्न निर्णीत करणेसाठी तसेच न्याय निर्णयासाठी आवश्यक सुधारणा करणेस परवानगी देता येते. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ३ प्रमाणे मयत वादीचे वारस अभिलेखावर घेणेची तरतूद आहे. वादी क्र.२ हिचे वादी क्र.१ मुलगा हा वारस आहे. दावा कारण चालू ठेवणेचा अधिकार वादी क्र.१ यांस प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे प्रस्तावित सुधारणा मंजूर करणे न्याय व योग्य होईल. करीता पुढील आदेश पारीत करीत आहे.

:: **<u>आदेश</u>** ::

१. निशाणी ५२ व ६३ वरील अर्ज मंजूर करण्यात येतात.

२. निशाणी ५२ व ६३ चे अर्जात विनंती केल्याप्रमाणे सुधारणा करण्यास वादीस परवानगी देण्यात येते.

३. सुधारणा १४ दिवसांचे आंत करावी.

पनवेल,
दिनांक : १४-०६-२०२२.

(के.एम.सोनवणे)
३रे सह दिवाणी न्यायाधीश
वरीष्ठ स्तर पनवेल.